


PTVA Schools
# दर्पण
For private circulation only





VOLUME: 02 | ISSUE : 03 | 8 PAGES
March 2024

## संपादकीय

### Make the most of your vacations!

We find ourselves approaching the culmination of another academic year. With exams just days away and the promise of a well-deserved vacation, this is a crucial time for our students.

Examinations extend far beyond the marks achieved. They serve as a platform for our students to showcase their knowledge and understanding. These assessments play a crucial role in preparing our students for the challenges in their life ahead, instilling in them resilience and perseverance.


Smita Biwalkar

As we eagerly anticipate the onset of summer vacation, let us not forget that it is the best time for developing our creativity and critical thinking. I encourage our students to explore their passions and interests, either through joining short-term hobby courses that nurture life skills. Read a lot of books. Also, find time to travel and bond with your family.

It is equally essential that we prioritise self-care. Physical exercise, adequate sleep and a balanced diet are crucial components of a healthy routine.

Before I conclude, I wish each of you a Happy Gudi Padwa!

नववर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढीपाडवा. गुढी हे स्वातंत्र्याच्या विजय ध्वजाचे प्रतीक आहे. वर्षभरात जे काही साडेतीन मुहूर्त कल्पिले आहेत त्यापैकी पूर्ण मुहूर्ताचा हा दिवस. शुभकार्यासाठी तसेच चांगले संकल्प करण्यासाठी हा उत्तम दिवस मानला जातो. एखादा नवा चांगला संकल्प या दिवसाच्या मुहूर्तापासून करून तो कमीत कमी वर्षभर तरी निश्चयपूर्वक पाळण्याची मनापासून प्रतिज्ञा केली तर मन खंबीर तसेच दृढनिश्चयी होऊ लागेल. मग आयुष्यात आपल्या कर्तृत्वाच्या, ज्ञानाच्या विजयी गुढ्या जगाच्या उंच आभाळात आपण उभारू शकू.

**- Mrs Smita Biwalkar, Headmistress, PTVEMS (Secondary)**

# अभिराज आणि नियती यांचे नमो कौतुक

**राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या अनेक गुणवंतांची नावे नेहमी ऐकायला मिळतात. विद्यालयाच्या या गौरवशाली परंपरेत आणखी एका दैदीप्यमान यशाची भर पडली आहे.**



पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागातील माजी विद्यार्थी अभिराज राजाध्यक्ष याने पुन्हा एकदा पार्ले टिळकचे नाणे खणखणीत वाजवून दाखवले आहे. नॅशनल क्रियेटर्स अवॉर्ड 2024 या पुरस्काराने सन्मानित झालेला अभिराज राजाध्यक्ष हा २००८ च्या बॅचचा एक हुशार, नम्र, कला- क्रीडा क्षेत्रात रमणारा गुणी विद्यार्थी म्हणून परिचित होता. ८ मार्च २०२४ रोजी दिल्लीतील भारत मंडपम कन्व्हेन्शन सेंटर मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अभिराज आणि त्याची जोडीदार नियती या दोघांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पंतप्रधानांनी अभिराजचे विशेष कौतुक केले.

अनेक समाजोपयोगी विषयांवर चुरचुरीत भाष्य करून अभी आणि नियु यांनी लोकप्रियता मिळवलीच आहे. आता या पुरस्काराने त्यांची राजमान्यता देखील सिद्ध झाली आहे. या पुरस्कार सोहळ्याप्रसंगी नवभारताच्या दृष्टिकोनाला आकार देणारा प्रणेता या शब्दात अभिराजचे कौतुक करण्यात आले. मराठी माध्यमातून शिकून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नेत्रदीपक यश मिळवणारा अभिराज हा विद्यार्थ्यांसाठी नक्कीच एक आदर्श उदाहरण आहे.

## The Gholam siblings make PTVEMS proud

Kavya Gholam and Bhagya Gholam of PTVEMS (Secondary) won bronze medals at the 13th Silent Knight Karate Cup 2024, which took place in Malaysia from March 8 to 10. It saw participation of 700 representatives from 25 nations. School Headboy, Anurag Chapekar, and Headgirl, Sannidhi Nair interviewed Kavya and Bhagya. Kavya and Bhagya shared their experience of playing the international competition, how they trained for it, their feelings of making India proud, and much more.



To read the full interview, please visit school website - www.ptvenglishmediumsecondary.com/

## PTV (ICSE) Teacher among the Top 100 winners of International Teachers' Olympiad



Mrs Rashmi Merchant, a teacher from the Primary Section of PTV (ICSE) has achieved a remarkable distinction by being among the top 100 winners of the International Teachers' Olympiad 2023.

She has been awarded a certificate and cash prize of ₹10,000/-. This recognition serves as a testament to her dedication, hard work, and innovative teaching methodologies, which have significantly enriched the educational landscape.

# विजनरी वूमन पुरस्काराने जान्हवी खांडेकर सन्मानित

**ठाणेवैभव आणि वावीकर आय इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या मुख्य समन्वयक आणि PTVA Schools दर्पण वार्तापत्राच्या संपादिका जान्हवी खांडेकर यांना विजनरी वूमन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**





श्रीमती खांडेकर २०१९ मध्ये पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या मुख्य समन्वयकपदी रूजू झाल्या. त्याआधी १५ वर्षे ठाण्याच्या ज्ञानसाधना एशिअन इन्स्टीट्यूट येथे त्यांनी प्राचार्य म्हणून काम पाहिले. मुंबई आणि मणिपाल विद्यापीठाच्या एमबीए आणि बीबीएच्या विद्यार्थ्यांना विविध व्यवस्थापन विषयांचे अध्यापन त्यांनी केले आहे. आकाशवाणी मुंबई येथे चार वर्षे वृत्तनिवेदिका म्हणून त्यांनी काम केले आहे. लोकसत्ता, सकाळ, सामना, दिव्यमराठी या मराठी वृत्तपत्रांतून विविध सामाजिक, शैक्षणिक आणि स्त्रीविषयक विषयांवर स्तंभलेखन त्यांनी केले आहे. दिव्यमराठीच्या रसिक पुरवणीत ताज्या घडामोडी आणि आत्मचरित्रांवर आधारित 'स्वगताच्या संगतीने' हे स्तंभलेखन त्या करीत होत्या. सामना दैनिकाच्या पुरवणीसाठी सलग दोन वर्षे व्यक्तिमत्व विकास, संभाषण कौशल्ये आणि स्त्रीविषयक सामाजिक घडामोडी याविषयावर साप्ताहिक सदराचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांना २०१९ साली कलानिधी Woman of Substance हा पुरस्कार मिळाला. शालेय जीवनात राज्य शिष्यवृत्ती तर महाविद्यालयीन काळात राष्ट्रीय शिष्यवृत्ती त्यांनी प्राप्त केली आहे. पदव्युत्तर शिक्षण काळात विद्यापीठ आयोगाची शिष्यवृत्ती त्यांना मिळाली. अनेक आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व, निबंध लेखन स्पर्धेत पारितोषिके पटकावली आहेत. कथालेखनासाठी आंतरराज्य स्तरावर पुरस्कार देखील त्यांना मिळाला आहे.

डॉ.चंद्रशेखर आणि डॉ. वैशाली वावीकर, 'ठाणेवैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ आणि सरस्वती विद्यालय शाळेच्या अध्यक्षा मीरा कोर्डे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळेस एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर उपस्थित होते. 'ठाणेवैभव'चे व्यवस्थापकीय संपादक निखील बल्लाळ यांनी आभार प्रदर्शन केले तर साधना जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

# राहिले दूर घर माझे

## जागतिक चिमणी दिन



**"एक घास चिऊचा" असे म्हणून बाळाला घास भरवणाऱ्या आईपासून आणि आपल्या सर्वांपासून चिऊताई दुरावत चालली आहे. तिचे महत्त्व ओळखून २०१० सालापासून २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिन म्हणून साजरा केला जातो.**

निसर्गातला हा लहानसा पक्षी नकळत आपल्या जीवनामध्ये अनेक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. आजपासून २०-३० वर्षांपूर्वी चिमणी हा पक्षी आपल्या मानवीवस्तीत सहज पाहायला मिळत असे पण गेल्या काही वर्षांत झालेली झाडांची बेसुमार कत्तल, जंगलांचे काँक्रिटीकरण यामुळे चिमण्यांच्या आकड्यात घट होत चालली आहे.


काही अनुभवी शास्त्रज्ञांच्या अहवालानुसार गेल्या १५-२० वर्षांमध्ये चिमण्यांच्या संख्येत सुमारे ८५% घट झाली आहे. त्यामुळे चिमणी हा पक्षी दुर्मिळ होईल की काय अशी भीती वाटू लागली आहे. सामान्यपणे मनुष्यवस्तीच्या जवळपास राहणारा हा पक्षी. पण जंगलतोड व सिमेंटच्या मजबूत इमारतींच्या बांधकामामुळे चिमण्यांच्या निवासाचा प्रश्न उभा राहिला. तसेच सध्याच्या आधुनिक काळात ५ - जी च्या दिशेने वाटचाल करताना मोबाईलमधून निघणाऱ्या रेडिएशनमुळे चिमण्यांचा फक्त मृत्यूच नाही तर त्यांच्या प्रजनन क्षमतेवर सुद्धा परिणाम होत आहे. या गोष्टींकडे कोणाचे लक्षच नाही. परिणामी चिमण्यांची संख्या कमी होत आहे.

त्यामुळे त्याचा गंभीर परिणाम विविध घटकांवर होत आहे. शेतातील पिकांवर याचा थेट परिणाम झालेला दिसून येतो. चिमण्यांचे मुख्य अन्न म्हणजे अळ्या, कीटक, टोळ, इ. परंतु चिमण्यांचे प्रमाण कमी झाल्याने कीटकांचे प्रमाण वाढू लागले आहे. त्यामुळे शेतकरी दादांचे फार नुकसान झाले आहे आणि कृत्रिम कीटकनाशकांमुळे आपल्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या सर्वांचा परिणाम कळत-नकळत परिसंस्थेवर होत आहे. त्यामुळे असे म्हणण्यास काही हरकत नाही की आपण आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत आहोत.

हे सर्व रोखण्यासाठी शक्य असेल तर घरासमोर, गच्चीवर बगीचा तयार करावा. चिमण्यांसाठी कृत्रिम घरट्यांची सोय करावी, त्यासाठी गवत, काड्या, कापूस इ. गोष्टींचा वापर करावा. चिमण्यांसाठी धान्य रस्त्यावर न टाकता त्याची व्यवस्थित सोय केली पाहिजे. त्यात धान्य, मोड आलेली कडधान्य अशा नैसर्गिक खाद्यांचा समावेश असला पाहिजे. फक्त चिमणी दिनाच्या दिवशीच नाही तर वर्षभर आपल्या स्तरावर त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. चला तर आपल्या आवडत्या चिऊताईंना आवाहन करूया, "या चिमण्यांनो, परत फिरा रे, घराकडे अपुल्या..."

**-अथर्व सुधीर धासरे (८/५)**

# वसंत विषुव




**पृथ्वी स्वतःच्या अक्षाभोवती फिरल्यामुळे दिवस आणि रात्र होतात. पण पृथ्वीचा आस सरळ नसून थोडा कललेला आहे. त्यामुळे दिवस आणि रात्र हे रोज सारख्या कालावधीचे नसतात. जो गोलार्ध सूर्याकडे कलतो त्या गोलार्धात दिवस बारा तासांपेक्षा लहान असतो. पण वर्षातून दोन वेळा २१ मार्च व २२ सप्टेंबर या दोन्ही दिवशी पृथ्वीवर सर्व ठिकाणी दिवस व रात्र हे समान १२ तासांचे असतात. हे दिवस म्हणजे विशिवदिन.**

यातील २१ मार्च हा दिवस spring Equinox (वसंत विषुव) म्हणून ओळखला जातो. या दिवसापासून पृथ्वीच्या उत्तर गोलार्धात दिवस मोठा व रात्र लहान होत जाते. पृथ्वीच्या परिवलनामुळे दिवस व रात्र होतात. तर पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे ऋतू निर्मिती होते. उत्तर गोलार्धात या दिवसापासून वसंत ऋतुची सुरुवात होते.

**-अंजली प्रभूकेळुस्कर, शिक्षिका, पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळा**

**मोहल्ला कमिटी मुव्हमेंट ट्रस्टतर्फे ६ डिसेंबर रोजी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागातील कु.रूतिका मिताली महेश वाडेकर(१०/६) हिने प्रथम क्रमांक पटकावला होता. ९ मार्च रोजी झालेल्या बक्षीस समारंभात तिला रु.२०००/- रोख, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.**



# शिक्षिका प्रीती मोदगी सेवानिवृत्त



**पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम प्राथमिक शाळेच्या शिक्षिका श्रीमती प्रीती विश्वास मोदगी या २९ फेब्रुवारी २०२४ या दिवशी शिक्षिका पदावरून सेवानिवृत्त झाल्या.**

श्रीमती मोदगी यांची २३/०३/१९९१ या दिवशी शिक्षिका या पदावर नेमणूक झाली. ३३ वर्षे शिक्षिका या पदावर त्या कार्यरत होत्या. श्रीमती प्रीती मोदगी यांचा मराठी हा आवडीचा विषय असून त्यांना वाचनाची अतिशय आवड आहे. शिस्तप्रिय नियोजनबद्ध, सर्व काम वेळेत पूर्ण करणाऱ्या व प्रवासाची भरपूर आवड असलेल्या, चपळ, परखडपणे विचार व्यक्त करणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी पार्ले टिळक विद्यालय व संस्थेकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.



**अभिनव पार्ले आयोजित प्रबोधनकार ठाकरे जलतरण स्पर्धेत पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेऊन उत्तम यश मिळवले. या स्पर्धेचे आयोजन पालकांनी उत्कृष्टपणे केले होते.**



**बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे मराठी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विविध आंतरशालेय स्पर्धा वर्षभरात आयोजित केल्या होत्या. या आंतरशालेय विविध स्पर्धांचा बक्षीस समारंभ अस्मिता विद्यालय या शाळेत १५ मार्च रोजी पार पडला. पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी वर्षभरात निरनिराळ्या स्पर्धेत भाग घेतला होता व मोठ्या प्रमाणात यश मिळवले. वैयक्तिक व शाळेसाठी सामूहिक बक्षिसे पटकावली आहेत. यावर्षी शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केल्यामुळे शाळेची मान उंचावली आहे.**



**सरस्वती विद्यामंदिर, माहीम येथे जागतिक विज्ञान दिनानिमित्त डॉक्टर मुक्ता कोटणीस यांच्या स्मरणार्थ २६ फेब्रुवारी रोजी वैज्ञानिक समस्या निराकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ज्युनिअर गटात पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागातील अक्षरा उज्ज्वला राजाराम पाटील (७/४) आणि तन्मय मनीषा समीर मिसाळ (६/४) या दोन विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या दोन्ही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख रु.७००/- एवढी रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली.**






**८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त पालकांची एकपात्री अभिनय स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेला पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पालकांनी आपली भूमिका छान सादर केली. या दिवशी महिला पालकांनी ट्रान्सजेंडर सारखा विषय अभिनयातून योग्य रीतीने सादर केला.**



**मुंबई पोलीस ट्रॅफिक कंट्रोलतर्फे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त २९ जानेवारी रोजी वक्तृत्व, घोषवाक्य व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. वक्तृत्व स्पर्धेत पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागातील कु.गार्गी गायत्री शैलेश पाटील हिचा जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक, निबंध स्पर्धेत वॉर्ड स्तरावर कु.आयुषी अदिती आतिश कदम हिचा द्वितीय क्रमांक आला असून पुढे जिल्हास्तरासाठी तिची निवड झाली आहे. तर घोषवाक्य स्पर्धेत यश पांचाळ 9/5 या विद्यार्थ्याचा प्रथम क्रमांक आला आहे.**

# विविध कार्यक्रमांतून साजरा झाला मराठी भाषा गौरव दिन





**पार्ले टिळक असोसिएशनच्या पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा, पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक, परांजपे विद्यालय प्राथमिक शाळा, परांजपे विद्यालय माध्यमिक शाळेत विविध उपक्रम राबवून २७ फेब्रुवारी २०२४ रोजी  जागतिक मराठी भाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.**

नेहमीप्रमाणे सकाळी मराठी भाषेची थोरवी तसेच कुसुमाग्रजांची माहिती सांगणारा ध्वनिक्षेपित कार्यक्रम पार्ले टिळक माध्यमिक विभागात सादर झाला. मराठी भाषा संवर्धनाच्या दृष्टीने जागृत असणारे विद्यालयातील अभिजात मराठी वाङ्मय मंडळ अनेक भाषिक उपक्रम राबवत असते. मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून इयत्ता पाचवी ते नववीच्या मुलांसाठी अभिवाचनाचा उपक्रम राबविण्यात आला. कोकण कट्टा या मराठीप्रेमी संस्थेतर्फे सर्व वर्गांसाठी अक्षररत्न २०२४ हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच कथेची गुंफण व जादू म्हणींची या दोन उपक्रमांतर्गत सर्व मुलांकडून अभिव्यक्ती पूर्ण सादरीकरण करून घेण्यात आले.

यावर्षी पार्ले टिळक प्राथमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी या दिवशी बालगीते, अभंग, विनोद, भारुड, लघुकथा साहित्यातील निरनिराळ्या प्रकारांवर ध्वनिक्षेपित कार्यक्रम सादर केले. वर्गावर्गांतून वाचन घेण्यात आले.

परांजपे विद्यालय माध्यमिक विभागात कुसुमाग्रज यांना विद्यालयातर्फे आदरांजली अर्पण केली गेली. त्यानिमित्ताने विद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वाङ्मय मंडळातील विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात लेझीम आणि ढोल ताशांच्या गजरात ग्रंथ दिंडीचे आयोजन केले होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री. हाक्के यांनी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. पर्यवेक्षिका सौ. लाड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यावर विद्यालयातील मराठी शिक्षिका सौ. बर्वे यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व, इतिहास, मराठी भाषेतील विविध ग्रंथ आणि साहित्यिक यांच्याबद्दल खूप छान माहिती सांगितली. मुख्याध्यापकांनीही विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या मार्गदर्शनपर भाषणात आपल्या दैनंदिन जीवनात जास्तीत जास्त प्रमाणात मराठी भाषेचा वापर करण्याचे आवाहन केले. तसेच मराठी भाषा ही आपली माता आहे तिला अधिकाधिक संपन्न करण्यासाठी तिच्या समृद्धीसाठी ज्या साहित्यिकांनी आपले जीवन व्यतीत केले त्यांच्याबद्दल आपण ऋणी असले पाहिजे असा संदेश दिला. वाङ्मय मंडळातील विद्यार्थ्यांनी याप्रसंगी विविध बालगीते सादर केली. तसेच काव्यवाचन, कथाकथन एकपात्री अशा विविध साहित्यरत्नांनी कार्यक्रमास शोभा आणली.

मराठी भाषा वळवावी तशी वळते. पण त्यासाठी ती भाषा तेवढीच समृद्ध देखील असावी लागते. मराठी भाषेसाठी हा वाक्प्रचार अगदी तंतोतंत जुळतो. कारण आपल्या मराठीची महतीच अशी आहे की एका शब्दाला अनेक समानार्थी शब्द आहेत. त्यात देखील शब्दातील छोट्याशा फरकाने होणारे अर्थबदल यामुळे भाषेची सुमृद्धता कळून येते.

परांजपे विद्यालय प्राथमिक शाळेत देखील हा दिवस यावर्षी मोठ्या उत्साहात साजरा झाला. या दिवशी दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांनी मिळून माझ्या मराठी मातीचा लावा ललाटी टिळा तिच्या संगे जागल्या दऱ्याखोऱ्यातील शीळा या गाण्यावर नृत्य सादर केले.

# वन्यजीवांचे विज्ञान विषयावर राष्ट्रीय विज्ञानदिनी मार्गदर्शन



**मानवाचे जीवन हा विज्ञानाचा आविष्कार आहे. या कृतज्ञतेतून 28 फेब्रुवारी 2024 रोजी पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला.**

विज्ञान दिनाची माहिती सांगणारा ध्वनिक्षेपित कार्यक्रम सादर झाला. पार्ले टिळक विद्यालयातील जिज्ञासा विज्ञान मंडळ वर्षभर निरनिराळ्या प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा यांचे आयोजन करते. या स्पर्धांमधील सर्व यशवंत विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाच्या दिवशी मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात येते. यावर्षी विज्ञान दिनाच्या कार्यक्रमासाठी अक्षय मांडवकर हे पर्यावरणप्रेमी पत्रकार प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. दै.मुंबई तरुण भारत या वृत्तपत्रात वरिष्ठ पर्यावरण प्रतिनिधी पदाचा कार्यभार सांभाळत असतानाच महाराष्ट्रातील महत्त्वाच्या वन्यजीव संवर्धन व संशोधन कार्यातही त्यांचा सहभाग आहे. विज्ञान दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी तुळशीचे रोप देऊन पाहुण्यांचे पर्यावरणस्नेही स्वागत करण्यात आले.

वन्यजीवांचे विज्ञान या विषयावर अतिशय माहितीपूर्ण असे व्याख्यान देत असताना त्यांनी स्वतः तयार करून आणलेल्या ध्वनी चित्रफिती दाखवल्या. खवलेमांजर, डॉल्फिन, वटवाघूळ या प्राण्यांवरील ध्वनिचित्रफिती मुलांना खूप आवडल्या. त्यांनी विचारलेल्या जिज्ञासापूर्ण प्रश्नांना श्री. मांडवकर यांनी माहितीपूर्ण उत्तरे दिली. काही विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांसमोर काही वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित प्रयोग सादर केले. या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन जिज्ञासा विज्ञान मंडळाच्या सदस्य विद्यार्थ्यांनी केले होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या दृष्टीने असे कार्यक्रम सहाय्यभूत ठरतात.



**29 फेब्रुवारी 2024 रोजी 'सन्मित्र विद्यामंदिर, गोरेगाव येथे अध्ययन संस्था मुंबई आयोजित 'महत्वमापन ऑलिम्पिक ''स्पर्धेत परांजपे विद्यालय माध्यमिक शाळेतील इयत्ता 8 वी व 9 वी च्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तसेच इयत्ता 6 वी व 7 वी च्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. सदर स्पर्धेत मुंबई उपनगरमधील 6 शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्री. हाक्के, पर्यवेक्षिका सौ.लाड, विज्ञान शिक्षक श्री. गोरुले व सौ. नाईस्कर यांनी मार्गदर्शन केले होते.**



## गुरुशिष्य दोघेही विजयी



**बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे आंतरशालेय हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. त्यात २२ शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत शाळेचे सहाय्यक शिक्षक श्री. तुकाराम कोळी यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आणि इयत्ता दुसरी मधील पार्थ मेस्त्री याला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.**



**संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान या संस्थेतर्फे रामायणावर आधारित लेखी परीक्षा घेण्यात आली. त्या परीक्षेत चौथीच्या ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये  प्रियंका प्रवीण डावरुंग हिला सुवर्णपदक मिळाले.**

# Fun with Sanskrit

PTVA's EMS, Andheri introduced Sanskrit language to the students of Std. VII with a beginner's course – Fun with Sanskrit. This course was curated by Sanskrit teacher Dr Shreehari Gokarnakar. PTVA Vice-President Shri. Vinay Jog and Chief Coordinator Mrs Janhavi Khandekar inaugurated the programme in April 2023. This introductory module of the course included interesting topics like self-introduction in



Sanskrit, Sanskrit alphabet, and Rhymes, Sambhashan (Sanskrit Conversation), Games, Songs, and Stotra.

The culmination of this course was arranged on January 20 and PTVA Director Shri Pramod Lele graced the occasion. The vibrant programme put up by the students was highly appreciated by the guests which also included parents in attendance. Students showcased their story-telling, communication, singing, and dance skills. The anchoring too, was done in Sanskrit by the students.

# New Beginning



**Each year we embark upon newer standards by pushing the finish line further as we go along. Each passing day teaches us that perfection is a moving target. We need to focus on the goal to the point of perfection. Being ready for any eventuality and venturing out into the deep, while striving for the ultimate best. And this is where education plays an important role in enabling a person to face real life situations with adequate knowledge.**

Looking within, we will discover our weaknesses and strengths. Self-awareness will help us to consciously improve ourselves and set us on the path of what the world needs most - good human beings - because our journey in life is not just about achievements but also about how we treat others. Compassion and kindness must be shown towards all for it is rightly said that in helping others we help ourselves, for whatever good we contribute to society completes the circle and comes back to us. So dear students, let us strive not only towards academic excellence but also inculcating kindness, trustworthiness, responsibility, optimism and self-control within us.

Personal growth is an essential component of life. Growth is the very essence of life. It encourages us to aim higher, dream bigger and strive for perfection in various areas. The readiness to take up a new responsibility at work or the ability to understand a friend all stem from personal growth and the willingness to step out of one's comfort zone. Self-growth can be one of the most beautiful and life changing moments.

Students, as you begin with a new academic year, forget all the negativities and failures of the past and look forward to a new beginning - new hopes, new aspirations, new dreams, new achievements - and take a firm decision to work hard with all possible efforts to make them come true.

**- Ms Florin Almeida, Assistant Primary Teacher at PTV (ICSE)**

# Zee Saregamapa Little Champs...

I am pleased to inform you that I have achieved the second position in the esteemed Zee Marathi singing show "Zee Saregamapa Little Champs" judged by Padmashree Suresh Wadkar. Along with a cash prize and several gift vouchers, I have received three offers for albums and playback singing.




My journey began in mid-July 2023 when I was selected in the mega auditions. The show followed a Gurukul culture theme which required me to stay away from home for several months. While my parents and friends played an essential role in supporting me throughout the competition, my school also played a vital role in providing assistance in various aspects. They graciously granted me concession from attending school and offered unwavering support.

I am immensely grateful for the way in which my achievements were celebrated. Our Headmistress Mrs Smita Biwalkar personally extended her congratulations in a special felicitation function organised for me.

**-Shravani Wagle (Std. IX C), PTVEMS**

# Ready to Navigate the Academic Horizon



Grade 8 students at PTV (ICSE) underwent a Subject Selection Orientation on January 18. This session, led by Principal Dr (Mrs) Arnavaz Bhagat, highlighted the importance of transitioning from grade 8 to grade 9 in the ICSE board examination. The focus is on a more specialised and in-depth study of individual subjects, necessitating the development of effective study habits, time management skills, and a proactive approach to learning. Dr Bhagat guided students and parents through the available subjects, emphasising how their selections would impact overall development. Beyond preparing for upcoming board examinations, the subject orientation instills a sense of academic responsibility and self-directed learning, essential for the students' educational journey.



# Budding athletes...

**PTVEMS (Secondary) students brought laurels to their school at the 50th Artistic Gymnastics District Gymnastics Championship organised by the Brihan Mumbai Jilha Gymnastics Sanghatana on March 8 at Prabodhankar Thackeray Krida Sankul.**

In the Boys U10 category, Shaurya Lad (Std. V D) clinched the gold medal in the Vaulting Table and silver medal in the Floor Exercise. He also emerged as the gold medalist in the All Rounder Champion category. Aaradhya Shelar (Std. V D) won silver medal in the Vaulting Table event.

The school's team comprising Shaurya Lad (Std. V D), Aaradhya Shelar (Std. V D), Neeraj Raut (Std. V A), and Rudra Sagvekar (Std. IV A) was awarded with a trophy for securing the second position in the Overall Team Championship category.



**At the Shri Chhatrapati Shivaji Maharaj Paramparik Krida Mahakumbh held on February 7, the following students of PTV (ICSE) brought laurels to the school in Rope Skipping at the District Level: U12 Boys: Ayush Zote (Std. VII A) – First, Nishant Gujaran (Std. V C) – Second, Abdul Rauf Shaikh (VI C) - Second**

**U12 Girls: Ayesha Shaikh (Std. III C) – First, Hiva Satra (Std. VI C) – Second, Drushti Dabhi (Std. III B) – Third, Zeenat Shaikh (Std. VI C) – Third**

**U14 Boys: Dishank Shah (Std. VII D) - Third**

**U14 Girls: Aarvi Sankhe (Std. VII A) – Second**

**U17 Boys: Aayush Satavase (Std. VII A) – Second**

**U17 Girls: Sanavi Joglekar (Std. VII C) – First, Drishyaa Satra (Std. VII D) - Third**

# PTVEMS (Secondary) students dazzle at Marol Athletics MASA event

**PTVEMS (Secondary) students excelled at different competitions at Marol Athletics MASA event on February 19. The event was held at Holy Family School Ground, Chakala.**

In the U16 Boys category, Parth Talkokul (Std. IX B) secured a gold medal in the 200m race, silver medals in relay, 80m and 50m races.

In the U16 Girls category, Urvi Parab (Std. IX D) bagged bronze medals in 200m and 50m races, and silver medals in 80m race and relay event. Siya Devrukhkar (Std. IX C) earned silver medals in relay, 200m and 50m races, a bronze medal in the 80m race, and gold medal in Shot-put event. Shivangi Pai (Std. VII A) clinched a gold medal in the 200m race and relay, and a bronze medal in the 80m race.



In the U16 Girls' relay race, Team A, comprising Devika Jadhav, Urvi Parab, Siya Devrukhkar and Sai Khopkar, secured a silver medal in the 4×100m relay event. Meanwhile, Team B, consisting of Mugdha More, Arya Tawde, Swara Shinde, and Shivangi Pai, emerged victorious and won a gold medal. In the U16 Boys' relay race, Team A, consisting of Parth Talkokul, Arav Ghosalkar, Vignesh Chalke and Varad Jondhale, earned a silver medal in the same event.



**Pratyush Mone (Std. VII) of PTV (ICSE) showcased exemplary talent and skill by clinching one gold and a bronze medal in the musical forms and point 5 kickboxing categories respectively, at the State level Championship organised by the esteemed WAKO India Kickboxing Federation Club in Baramati, Pune.**

# Thank you PTVEMS



**I want to express my heartfelt gratitude to my school for all it has done for me. I am a medalist at the national level in artistic gymnastics, and without the school's support, it would not have been possible.**

The competition season for my sport begins in September and October when we have our school and other competitive exams. I recall when I was in third stand, my NELTAS exam and a gymnastics' meet clashed. Still, the school allowed me to appear for the exam at my convenience. There have been many such clashes, but my school has been supportive.

Gymnastics is a sport that demands a lot of time. My coach told me I needed to practise twice daily when I was in IX standard. For this, I needed permission from the school. With no hesitation our Headmistress granted me the required concessions. So, for the past two years, I have attended school every day after the first recess.

Managing academics and sports is challenging. Therefore, time management is crucial. At times, I have failed to manage my time. But my teachers never pressured me into any submissions; they would encourage me to focus on my sport. Our PT teachers have greatly helped me.

Throughout my school years, I never attended tuition or coaching classes because I have always felt that paying attention to whatever is taught is enough. Because of the friendly environment in school, it has always felt like a family to me.

The day I first stepped into this premises remains etched in my mind. All these wonderful experiences have made school feel like a second home to me. And now that the time has come to leave it behind, I promise to carry it in my heart forever.

**- Anoushka Patil (Std. X C), PTVEMS**

# BNHS conducts workshop on production of eco-friendly colours




On March 14, a workshop was organised at PTVEMS (Secondary) under the auspices of the esteemed Bombay Natural History Society (BNHS) on the production of natural colours for the celebration of Holi. The primary objective of this workshop was to impart knowledge to the students regarding the creation of organic colours derived from fruits, flowers and vegetables. The workshop aimed to guide the students in making informed decisions by encouraging them to opt for safe and environmentally friendly natural colours, as opposed to chemical-based alternatives.



**13 students of Std. VII from PTVA's EMS, Andheri, excelled in the Elementary Drawing Examination conducted in September 2023. The result was announced in February 2024. Three students, Pratham Gurav, Anushri Shinde, and Maitreya Koranne bagged the much coveted 'A' grade certificates, four students achieved 'B' grades and six students achieved 'C' grades. These students were given in-house coaching by the Art Teacher Mrs Ashwini Naravane. The certificates were distributed to the achievers at the hands of the Principal Mrs. Mrinalini Mhetre.**



**At the Maharashtra State Inter School Karate Championship a total 100 athletes participated from Mumbai Suburb District. Six players from PTV (ICSE) won gold, silver and bronze medals for their excellent performance and are selected to play at the International Karate Tournament to be held in Nepal in the month of May 2024.**

**Winners: Hridan Kerkar (Std. II A) – Gold, Aaradhya Neman (Std. III B) – Silver, and Sparsh Shinde (Std. II B), Spruha Shinde (Std. II B), Varman Gada (Std. II A), and Samihan Mehendale (Std. II B) – Bronze.**

# Celebrating National Science Day




PTVA's EMS, Andheri



PTVEMS (Secondary)

**PTVEMS (Secondary) and PTVA's EMS, Andheri celebrated National Science Day in their schools on February 27 to commemorate the immense contributions of Sir. CV Raman, a revered scientist who won the Nobel Prize in Physics for his work on light scattering. The theme for Science Day 2024 'Indigenous Technology for Vikasit Bharat', focused on indigenous innovations.**

Mrs Smruti Mogrey, teacher at PTVEMS (Secondary), delivered a speech emphasising the importance of nurturing a scientific temper and embracing a rational and scientific approach. The Science Club organised a guest lecture on February 29 on Dental Hygiene and Care. Dr Ajinkya Deorukhkar, the school's alumnus and the guest speaker, shared insights on making a career in dentistry, recent advances, brushing techniques and oral hygiene maintenance. The session was interactive with students engaging in discussions and asking questions. The Science Club members also presented the work of unsung Indian Scientists through a PowerPoint presentation.

In alignment with this year's theme, PTVA's EMS, Andheri organised age-appropriate Science Experiment Demonstrations for the students. It aimed to popularise the importance of Science, Technology, Mathematics, and Engineering (STEM) and enhance innovative approaches through hands-on experiments. The Sci-Phy team of Sathaye College students under the guidance of Asst. Professor Mrs Sukruta Pethe conducted a series of wonderful science experiments related to the Centre of Mass, Stress-related experiments, Optics related experiments, etc. Students of the lower grades too performed simple yet interesting experiments like walking water and tooth-pick star (capillary action), static electricity, and the like.

# Unleash Your Inner Poet



**Students of Grades 6 and 7 of PTV (ICSE) were engaged in a captivating Book Club activity centred around self-composed poetry. The students were encouraged to write on themes like "Nature's Wonders" or "Dreams and Imagination." Through guided discussions, writing sessions, and sharing circles, students embarked on a poetic journey, honing their literary skills while expressing personal insights and emotions in a supportive, collaborative setting.**

# Acknowledging Women on this International Women's Day

**PTVEMS (Primary) celebrated International Women's Day on March 11. It's a day which is celebrated around the globe with lots of love and happiness. It's an occasion where we show how much women and their existence mean to us. Women are not just 'child - bearers ', women have their own identity. Morever, each woman is amazing, regardless of where she works.**
Ms Sweni Barbose, teacher



at PTVEMS (Primary) gave information on the importance of the Day. Ananya Dhareshivkar (Std. II B), Prapti Kubal (Std. III A), and Krudaya Kadam (Std. III A) were dressed up like Mother Teresa, Jhansi Ki Rani and Kiran Bedi respectively. They shared the message to respect and appreciate the women in our lives every day and inspire them for greater future achievements.

**-Mrs Saira Periera, Class Teacher of Std. II D, PTVEMS**



**In the Girls U10 group, Swati Mohite (Std. IV C), a student of PTVEMS (Primary) won gold medals in Vaulting Table and Uneven Bar, silver medal in All Rounder category, bronze medal in Floor Exercise, and first place in the overall team championship segment at the 50th Artistic Gymnastics District Championship 2023-24 on March 8 at Prabodhankar Thakare Krida Sankul, Vile Parle. It was organised by the Bruhanmumbai Jilha Gymnastics Sanghtana Affiliated to Maharashtra Amateur Gymnastics Association.**



**Sanavi Desai**



**Shivangi Pai**

**Sanavi Desai (Std. VII A) and Shivangi Pai (Std. VII A), of PTVEMS (Secondary) have been selected for the national level Mallakhamb competition to be held at Haryana from March 27 to 30.**



**The students of PTVEMS (Primary), Anvay Hase (Std. II A), Avaneesh Gokhale (Std. II B), Ananya Dhareshivkar (Std. II B), Keyaan Jethwa (Std. II B), Spandan Maskar (Std. II C), Tejasvi Oke (Std. III D), Anaya Pawar (Std. III C), Vishwesh Raul (Std. III A), Kiyansh Chittal (Std. III B), Sangha Gangurde (Std. IV A), Lucas Kinny (Std. IV B), and Shaurya Wategaonkar (Std. IV C) earned gold medals and participation certificates at the International Maths Olympiad (IMO) conducted by the Science Olympiad Foundation (SOF).**

## Importance of International Forest Day

**International Forest Day is celebrated every year on March 21 to raise awareness about the importance of forests and trees in our lives. Forests play a crucial role in sustaining life on earth by providing clean air, water and habitat for various species. They also contribute to climate regulation and support the livelihoods of millions of people around the world.**

Forests are home to a diverse range of plants, animals and micro-organisms, making them essential for biodiversity conservation. They absorb carbon dioxide from the atmosphere and help mitigate climate change. Moreover, forests provide



numerous ecosystem services, such as soil stabilisation, erosion control and pollination which are vital for agricultural productivity and human well-being.

To protect and sustainably manage our forests, it is crucial to promote conservation efforts and responsible forest management practices. This includes combating deforestation, promoting reforestation and afforestation initiatives and supporting indigenous communities and local stakeholders in their efforts to conserve and manage forest resources.

International Forest Day serves as a reminder of the critical role that forests play in sustaining life on earth. By raising awareness and taking collective action to protect and conserve our forests, we can ensure a sustainable future for generations to come.

**- Varuni Patel (Std. IV A), PTVEMS**

## Joy of Giving



**The joy of giving is a beacon of kindness that radiates from the hearts of students. As they collected clothes, books, and stationery in the week dated February 1 to 8, their enthusiasm had no bounds. With a sense of responsibility towards society, these generous offerings were handed over to the NGO R Society R Responsibility. Through the dedicated efforts of local social worker Vaishali Ahire and Ms Jyoti, these items were distributed to the Filter Pada Anganwadis and slums, bringing smiles and hope to those in need.**

# Marathi Bhasha Din celebrated at PTVA schools



**PTVA's EMS, Andheri**



**PTVEMS (Primary)**



**PTVEMS (Secondary)**

# Ringing in a grand Annual Sports Day






**PTVEMS (Primary) celebrated its Annual Sports Day on February 11. Shri Ganesh Devrukhkar, the Dronacharya Awardee and an alumnus of PTVEMS, graced the function as the chief guest. Shri Vinay Jog, Hon. Vice President, PTVA, Mrs Kalpana Kalekar, Headmistress, PTVEMS (Primary), teaching and non-teaching staff, students and parents were present to witness the grand event.**

The proceedings began with a glorious and well-synchronised March Past, leaving the audience speechless. Shri Jog hoisted the school flag, followed by the school's PT teacher, Mrs Agnes Shastri, requesting a declaration of the Meet Open.

There were vivid field displays by energetic Arm Sports participants and track events for the qualified finalists. Parents, teaching and non-teaching staff also enthusiastically participated in the events held for them. In the end, Shri Devrukhkar gave an inspiring speech and the programme culminated with a prize distribution ceremony.

**- Mrs Anupama Shrivastava, Class Teacher of Std. IV C, PTVEMS**




**Atharva Ankolekar, an ex-student of PTVEMS was named the Captain of the Mumbai team for the Under-23 Col. C.K. Nayudu Trophy 2023-2024.**

## PTVA's EMS, Andheri, promotes Activity-Based Learning

**Activity-Based Learning (ABL) is, most simply, creating tasks, situations, activities, and other instructional ways to guide children to acquire, understand, and apply new information and skills that will help them in their studies and their lives. ABL expects learners not just to think but to do and to feel (i.e., to have emotions). Research states that children learn better when they learn with all five senses, they can handle and apply their lessons, and they are motivated with a clear sense of purpose.**



PTVA's EMS, Andheri in association with the Manashakti Kendra, Lonawale, organised a day-long activity-based learning programme for the students on February 7 which included prayers, story-telling, craft and drawing lessons, science experiments, yoga, and a presentation by dentist Dr Manjusha Shevale.

Mrs Pallavi Sahastrabuddhe of the Pranic Centre, Mumbai conducted Super Brain Yoga sessions for the students on January 19 and 20 which demonstrated simple, tried, and tested techniques to activate the left and right brain and attain the left-right equilibrium.

## Neevan Naik –The Budding Naturalist

**Nevaan Naik (Std. II), a student of PTVEMS (Primary) was associated with International Wildlife Project led by Dr Mahesh Sanzgiri since January 2023. As a part of the project, he has been involved in various activities such as visiting wildlife sanctuaries, bird counting, forest cleanup, participating in exhibitions, online and offline conferences/ gatherings/webinars and preparing reports thereof.**



His online presentation on "Sparrow" held in February 2023 by the International Rewild Institute, Europe, won him the first prize for the best presentation in Group I category. His poster of "Butterfly" submitted during "Butterfly Festival" at "Maharashtra Nature Park (Mahim)" arranged by Vivan Unearthed Foundation in April 2023, was selected as best Poster among Primary School submission and put on "Facebook of Vivan Unearthed Foundation." He received a certificate of participation for participating in cleanup of Mumbai's Sanjay Gandhi National Park's core area by BNHS on March 3, 2024

# PTVEMS (Primary) celebrates Shivaji Jayanti with fervour







**On February 16, PTVEMS (Primary) observed Shivaji Jayanti. The students were dressed up in traditional outfits - boys as Mavlas and girls in Nauvari sarees. PTVA Co-ordinator Mrs Janhavi Khandekar graced the function. The school's Headmistress and Supervisor paid a floral tribute to the portrait of Shivaji Maharaj.**

The programme started with a speech by teacher Mrs Manashri Kashalkar, enlightening the students about the great warrior Chhatrapati Shivaji Maharaj. Later, prizes were presented to the winners of Singing and Mono-acting competitions, which were organised on the occasion of Shivaji Jayanti. Vedant Phadke (III C) mesmerised the students with his award-winning acting and performance by depicting an incident in Shivaji's life. Then, the school choir enthralled the audience with an energetic Ballad song praising the great work of Shivaji. The dance-drama was then presented by the students of Grade 4, who showcased the life of Shivaji Maharaj. Lathi display by Swara Salunkhe Patil (IV C) was eye-pleasing. The chants of 'Har Har Mahadeo', 'Jai Bhavani; Jai Shivaji', and Jai Jijau' during Lezim made the atmosphere electric.



**-Manashri Kashalkar, Class Teacher of Std. IV D, PTVEMS**

# The Pursuit of Happiness

**International Day of Happiness was celebrated on March 20, 2024. No no, it's not because it was the last day of our final exams, but because the United Nations declared it in 2012, recognising the importance of happiness.**

According to the recent World Happiness Index, the top three happiest countries are Finland, Denmark, and Iceland. These countries score high on equality, freedom, trust, and love for nature. India has made progress in the happiness index, currently ranking 126th. I am confident that with contributions from all of us, our country will one day reach the top of the happiness rank.

Happiness index looks at things like how much money people have, how healthy they are, and how much freedom they have to make choices in their lives. It also looks at how people feel about their communities and how much they trust others. By looking at all these things together, we can see which countries have the happiest people.

On the occasion of International Day of Happiness, I want to share my experience of true happiness. Can you guess what could have given me true happiness? Birthday gifts, books, my favourite food, a holiday trip? Surprisingly, none of these. My true happiness came from the joy of giving. Recently, I had the opportunity to collect donations for an NGO that works for underprivileged people. When they approached me, I gladly accepted and was given a Gullak (like a little piggy bank) by them. My parents explained that my efforts in collecting money for this NGO would help people in many ways, which made me feel strong and responsible.



I visited 41 houses, explaining the purpose of the Gullak and the work done by the NGO. Everyone supported by contributing to the Gullak, and I had a lot of fun. When I handed over my Gullak filled with money, the NGO team thanked me and took my photo too. It was such a proud moment for me. That's when I realised: giving happiness equals getting happiness.

As we celebrate International Day of Happiness, let's remember that happiness comes from being kind and caring to others. We all have the ability to make ourselves happy and spread good feelings to those we meet. Find what makes you happy and enjoy every day with joy and gratitude.

**- William Passanha (Std. V A), PTV (ICSE)**

## The Elixir of Life

A long line of women waits in the baking sun
Throats parched, an earthen pot at the hip
Waiting for water, shuffling ahead, one by one.



A droplet echoes in the calm- plip!
From the leaky tap, ignored day by day
No one cares, for it's just a drip.

Wondering if it might finally rain today,
A farmer peers up at the sky
But no cloud is in sight, to his great dismay.

For a simple jug of water, hundreds sit by,
Yet we let it slip, carelessly, from our grasp
That many can only hope for, with a sigh.

Deified, yet besmirched,
Priceless, yet squandered away...
If we do noy take a step now,
What Earth will our descendants inherit?
- A cracked, parched world,
Where, amidst the steel contraptions
No plant sprouts, stream gurgles, or bird sings.
A doomed legacy.

We want not a world where people beg for water
with their dying rasp,
Not letting it slip from their grasp
But one where the elixir of life is plentiful.

**- Avanti Vete (Std. X), PTV (ICSE)**

## Tropism

**Imagine yourself as a minuscule seed buried deep within the earth. Darkness and limited space surround you, but escape is paramount. This is where a fascinating phenomenon called tropism comes into play. It acts as a secret weapon for plants, allowing them to perceive stimuli beyond their immediate vicinity.**



Consider chemotaxis, a remarkable ability akin to a detective with an exceptional sense of smell. Roots utilise this skill to detect water and essential nutrients within the soil, subsequently growing in their direction.

Furthermore, plants possess an internal compass. Phototropism enables them to sense the warmth of the sun. Their stems exhibit a bending motion, growing upwards in a manner similar to how we might reach for a delicious treat. This explains why all the plants on your windowsill lean in one direction – they're essentially performing a specialised plant movement to maximise sunlight absorption.

However, the wonders of tropism extend further. Plants can even perceive the pull of gravity, a phenomenon known as gravitropism. Roots grow downward in response to Earth's gravitational force, while stems grow upwards in an attempt to escape it and reach towards the sky.

Therefore, the next time you witness a sunflower's head turning towards the sun or a beanstalk's impressive climb, remember that these marvels are orchestrated by tropism, the hidden power within plants.

**- Shaurya Saple (Std. V B), PTV (ICSE)**



## मुजरा आमचा स्वीकारावा

मराठमोळ्या मातीतील
हा जगदंबेचा छावा
राजा शिवछत्रपतींना
मुजरा आमचा स्वीकारावा

सह्याद्रीच्या कुशीत जन्मला
स्वराज्याचा सूर्य
होऊन बळकट मनगटी
धैर्य आणि शौर्य



आऊसाहेबांचे संस्कार
ध्यानात ठेऊनी जगले
मृत्युंजय पोटात घालुनी
प्राणपणाने लढले

थरथर कापती मोघल
भोर अशी त्यांची कीर्ती
याच मातीच्या पुत्रामुळे राहिली
मराठ्यांची मान ही वरती

देवासमान राजा आमचा
गेळ्यात भरून घ्यावा
राजा शिवछत्रपतींनी
मुजरा आमचा स्वीकारावा


**- Aryaa Deshmukh (Std. IX B), PTVEMS**


## नावे शोधा

**मी जंगलात फिरताना मला दिसलेले प्राणी तुम्ही खालील कोड्यातून शोधा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | ज | ग | र | वा |
| ह | स | सा | ल | घ |
| री | मा | च | ह | ड |
| ण | को | जि | त्ती | झे |
| मा | ल्हा | रा | | ब्रा |
| क | क | फ | गें | डा |
| ण | प | ड | त | नी |
| सिं | का | ळ | वी | ट |
| ह | का | स | व | मो |
| ब | म | ग | र | गा |
| ल | वी | त | र | स |

## चित्र पूर्ण करा





Ninad Mahadik, IV D, PTVEMS